अहवाल दिनांक : 10/10/2022

## महाराष्ट्र शासन

### गाव नमुना सात ( अधिकार अभिलेख पत्रक )

। महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम, १९७१ यातील नियम ३,५,६ आणि ७ ।

37026179474

गाव :- चिखली ( 944101 )    तालुका :- हवेली    जिल्हा :- पुणे

ULPIN : 37026179474    गट क्रमांक व उपविभाग : 1653

भू-धारणा पध्दती : भोगवटादार वर्ग -1    शेताचे स्थानिक नाव :

| क्षेत्र, एकक व आकारणी | खाते क्र. भोगवटादाराचे नांव क्षेत्र आकार पो.ख. फे.फा. | कुळ, खंड व इतर अधिकार |
|---|---|---|
| क्षेत्राचे एकक हे.आर.चौ.मी<br>अ) लागवड योग्य क्षेत्र<br>जिरायत -<br>बागायत -<br>ब) पोट-खराब क्षेत्र (लागवड अयोग्य)<br>वर्ग (अ) 20.22.00<br>वर्ग (ब) -<br>एकुण पो.ख. 20.22.00<br>एकुण क्षेत्र (अ+ब) 20.22.00<br>आकारणी 0.00<br>जुडी किंवा विशेष आकारणी - | 506 मोफत गायरान 14.05.00 ( 30957 )<br>~~[16493] [पिंपरी चिंचवड महानगरपालिका 6.1700 ]~~ ( 31487 )<br>18751 शासकिय जमीन 6.17.00 ( 31487 ) | कुळाचे नाव व खंड<br>इतर अधिकार<br>इतर<br>अनुसयाबाई कोंडीवा शिरवडे ( 1041 )<br>अर्जुन लक्ष्मण लोंढे ( 1041 )<br>उल्हासाबाई लक्ष्मण देशमुख ( 1041 )<br>क्षे 0.12 ( 1041 )<br>चोखोवा कुडलीक कांवळे ( 1041 )<br>छोटीराम गुलाव कहार ( 1041 )<br>जगाबाई दत्तू हुंडरे ( 1041 )<br>पोपट हरिभाऊ राखपसरे ( 1041 )<br>बबन शिवराम डिंबर ( 1041 )<br>बवन हरिभऊ राखपसरे ( 1041 )<br>बाळासाहेब महादू त्रिकोणे ( 1041 )<br>भिकाबाई गणपत ताजणे ( 1041 )<br>शरद उर्फ सर्जेराव वसंत लोंढे ( 1041 )<br>सरकारी घरकुले ( 1041 )<br>इतर<br>इतर<br>इतर<br>पिंपरी चिंचवड मनपाकडे देखभाली करिता ( 17861 )<br>इतर<br>पिंपरी चिंचवड महानगर पालिकेस 2हे 00 आर हॉस्पिटल, 1 हे 00 आर अग्निशमन केंद्र , 1हे 62 आर प्राथमिक शाळा ,1 हे 55 आर 12 मी. व 18 मी. रस्ता या प्रयोजनाकरीता राखीव ( 31487 )<br>प्रलंबित फ़ेरफ़ार : नाही.<br>शेवटचा फेरफार क्रमांक : 31487 व दिनांक : 22/09/2020 |
| जुने फेरफार क्र. ( 1 )( 8700 )( 17807 )( 17861 )( 27952 )( 29029 )( 30957 ) | | सीमा आणि भूमापन चिन्हे : |

### गाव नमुना बारा ( पिकांची नोंदवही )

। महाराष्ट्र जमीन महसूल अधिकार अभिलेख आणि नोंदवह्या ( तयार करणे व सुस्थितीत ठेवणे ) नियम,१९७१ यातील नियम २९ ।

गाव :- चिखली ( 944101 )    तालुका :- हवेली    जिल्हा :- पुणे

गट क्रमांक व उपविभाग : 1653

| | | | पिकाखालील क्षेत्राचा तपशील | | | | | लागवडीसाठी उपलब्ध नसलेली जमीन | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | हंगाम | खाता क्रमांक | पिकाचा प्रकार | पिकाचे नाव | जल सिंचित | अजल सिंचित | जल सिंचनाचे साधन | स्वरूप | क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| | | | | | आर. चौ.मी | आर. चौ.मी | | | आर. चौ.मी | |
| 2019-20 | खरीप | | | | | 0.0 | | गायरान पड | 0.0000 | |
| | | | | | | 0.0 | | देऊळ | 0.1000 | |
| | | | | | | 0.0 | | शाळा व क्रिडांगण | 2.4000 | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 0.0 | | सामाजिक वनीकरण | 17.5000 | |

टीप : * सदरची नोंद मोबाइल ॲप द्वारें घेणेत आलेली आहे

"या प्रमाणित प्रतीसाठी फी म्हणून १५/- रुपये मिळाले."
दिनांक :- 10/10/2022
सांकेतिक क्रमांक :- 27250007031198000010202211194

( नाव :- वर्षा ज्ञानदेव आरमाळकर )
तलाठी साझा :- [illegible] जि :-पुणे

गाव कामगार तलाठी
मौजे चिखली

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी, पुणे - ४११०१८

(नागरी व प्रशासकीय सेवेसाठी ISO ९००१:२००८ प्रमाणपत्र प्राप्त संस्था)

## भुमि आणि जिंदगी विभाग

कटिबध्दा जनहिताय

E-mail : Landestate@pcmcindia.gov.in

दुरध्वनी क्र : ०२०-६७३३१५३७


क्र.भूजि/सर्व्हे-३/कावि/ ०९ /२०२१

दि. १५ /०२/२०२१

## ताबा पावती

आज दिनांक- १५ /०२/२०२१ रोजी ताबा पावती करणेत येते की,

ताबा देणार

मा.सहाय्यक आयुक्त,
भूमि आणि जिंदगी विभाग
यांचे प्रतिनीधी श्री.बांबळे प्र. दे. - सर्व्हेअर
पिपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

ताबा घेणार

मा.अध्यक्ष
जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपिठ
टाळगाव, चिखली
यांचे प्रतिनिधी श्रीम.जोत्स्ना शिंदे – सचिव

मा.जिल्हाधिकारी, पुणे महसूल शाखा यांच्याकडील आदेश क्र.पमह/सीआर/१३/२०१६ दि.२६/१२/२०१६ अन्वये मौजे चिखली ता. हवेली जि.पुणे येथील गट नं.१६५३पै. मधील आरक्षण क्र. १/८९ (माध्यमिक शाळा) क्षेत्र १.८० हे.आर क्षेत्र पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस आगाऊ ताब्याने हस्तांतरीत झालेले आहे. या आरक्षणामध्ये मनपाचे 'फ' स्थापत्य विभागामार्फत जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपिठ विकसित करण्याचे कामकाज चालू आहे. सदर बांधकाम पुर्ण होऊन वापरायोग्य आणण्यास कालावधी जाणार असल्याने जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपिठ या कंपनीस सर्व प्रकारचे प्रशासकीय काम, नोंदणी शासन मान्यता, अभ्यासक्रम अथवा अन्य अडचण निर्माण न होण्याच्या दृष्टीने सदर विकसित करण्यात येणा-या जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपिठाचा ताबा जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपिठ या कंपनीस देणेबाबत मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी क्र.भूजि/९/कावि/७७/२०२१ दि.१०/०२/२०२१ अन्वये मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन मौजे चिखली ता. हवेली जि.पुणे येथील गट नं.१६५३पै. मधील आरक्षण क्र. १/८९ (माध्यमिक शाळा) क्षेत्र १.८० हे.आर क्षेत्रामध्ये विकसित करण्यात येणा-या जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपिठाचा ताबा जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपिठ या कंपनीस आज दि. १५ /०२/२०२१ रोजी देणेत येत आहे. तसेच ताब्यासह नकाशांच्या व इतर सर्व आवश्यक कागदपत्रांच्या प्रती मा.कार्यकारी अभियंता(स्था.) 'फ' क्षेत्रीय कार्यालयाकडुन प्राप्त होताच सर्व कागदपत्रे ताबा देणार यांचे विभागामार्फत अलहिदा देण्यात येईल.

ताबा देणार

मा.सहाय्यक आयुक्त,
भुमि आणि जिंदगी विभाग
यांचे प्रतिनीधी श्री.बांबळे प्र.दे - सर्व्हेअर
स्वाक्षरी -

ताबा घेणार

मा.अध्यक्ष
जगद्गुरु संत तुकाराम महाराज संतपिठ
टाळगाव, चिखली
यांचे प्रतिनिधी श्रीम.जोत्स्ना शिंदे – सचिव
स्वाक्षरी -

२९

# आगावू ताबेपावती

ताबा देणार : मंडलाधिकारी भोसरी ता.हवेली जि.पुणे
(अपर तहसिलदार कार्यालय,पिंपरी चिंचवड ता.हवेली जि.पुणे)

ताब घेणार : श्री. शंकर धर्मा बो–हाडे
सर्व्हेअर, नगररचना विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी पुणे.४११०१८

कारणे ताबेपावती लिहून देणेत/घेणेत येते की, मा.जिल्हाधिकारी सो.पुणे महसूल शाखा यांजकडिल आदेश क्रमांक.पमह/सीआर/१३/२०१६ दिनांक.२६/१२/२०१६ अन्वयें मौजे. चिखली ता.हवेली जि.पुणे येथिल गट क्रमांक.१६५३ यांसी एकुण क्षेत्र २० हेक्टर २२ आर क्षेत्र ही मिळकत गायरान संवर्गातील असून सदर मिळकतीचे एकूण क्षेत्रापैकी १ हेक्टर ८० आर क्षेत्र माध्यमिक शाळा या प्रयोजनार्थ पिंपरी चिंचवड महानगरपालीकेस हस्तांतरीत करणेबाबतचा आगावू ताबा देणेबाबत आदेश प्राप्त झालेल आहेत. सदर आदेशान्वयें वरील जमिनीचे एकूण क्षेत्रापैकी १ हेक्टर ८० आर क्षेत्राचा आगावू ताबा देणेत आलेला आहे.सदर जमिनीमध्ये आजरोजी पिंपरी चिंचवड मनपाचे चारही बाजूने सिमाभिंत बांधलेली असून सदर मिळकतीच्या पुर्वस अंदाजे २५ ते ३० आर क्षेत्रामध्ये श्री.कानिफनाथ मंदीर व उत्तरेस पिंपरी चिंचवड मनपा कडील सुरक्षा रक्षकाची खोली अंदाजे २ ते ३ आर आहे. उर्वरित मिळकती मध्ये पिचिंमनपामार्फत केलेले वनीकरण दिसून येत आहे. सदर जमिनी मिळकतीच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे असत :

१) पूर्वेस : गट नंबर.१६६१ ते १६६३ पैकीची मिळकत.
२) दक्षिणेस : गट नंबर.७४१ व ७५२ पैकीची मिळकत
३) पश्चिमेस : गट नंबर. १६५३ पैकी मिळकत
४) उत्तरेस : गट नंबर ~~१६५६~~ व १६६० पैकीची मिळकत

वरीलप्रमाणे जमिन मिळकतीच्या चतु:सिमा असून सदर मिळकतीमध्ये जाणे–येणेकरिता रस्ता उपलब्ध आहे. वरीलप्रमाणे मिळकतीचा आगावू ताबा आजरोजी देण्यात आला.

दिनांक : ०१/०२/२०१८

ताबा देणार ............ [signature] 1/02/2018
मंडलाधिकारी भोसरी ता.हवेली जि.पुणे
(अपर तहसिलदार कार्यालय,पिंपरी चिंचवड ता.हवेली जि.पुणे)

सत्यप्रत

[signature]
उपअभियंता
''फ'' प्रभाग स्थापत्य व मुख्यालय
पिंपरी-चिंचवड मनपा., पिंपरी-१८

ताबा घेणार ............ [signature]
श्री. शंकर धर्मा बो–हाडे
(सर्व्हेअर, नगररचना विभाग,पिंपरी चिंचवड महानगरपालिका)

वाचले :- १) आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र.नगररचना/१७/१५४/२०१५ दि.०९/०९/२०१५

२) आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील पत्र क्र. नगररचना/१७/२१/२०१७ दि.१८/०३/२०१७

३) आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्र. डिओ/नगररचना/६०७२०१९ दि.०९/०९/२०१९

४) शासन महसूल व वन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र. जमीन १०९१/७१२/प्र.क्र.५९/ज-१ दिनांक १४/१२/१९९८

५) शासन महसुल व वन विभागाकडील निर्णय क्र जमीन०३/२०११/प्र.क्र५३/ज-१ दि. १२/०६/२०११

६) शासन महसूल व वन विभाग कडील शासन निर्णय क्रमांक. जमीन ०५/२०११/प्र.क्र.९०/ज-१. दिनांक २७ जुलै २०११

७) शासन महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र. जमीन ०९/२०१२/प्र.क्र.७९/ज-१ दिनांक ३० नोव्हेंबर २०१२

८) शासन महसुल व वन विभागाकडील निर्णय क्र.जमीन/२०१५/प्र.क.४५/ज-१ दि.०१/०६/२०१५

९) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (सरकारी जमिनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ चे नियम ६

१०) महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.जमीन१०/२००५/प्र.क्र.३८/ज-१ दि.०७/०३/२००६

११) महाराष्ट्र शासन महसुल व वनविभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.जमीन०५/प्र.क्र.९०/ज-१ दि.२७/०७/२०११

१२) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचेकडील राजपत्र दि.३१/१२/२०१५

१३) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचेकडील राजपत्र दि.२६/०४/२०१७

१४) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग यांचेकडील राजपत्र दि.१५/०३/२०१८

१५) महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१७/प्र.क्र.२३४/ज-१ दि.२२/१०/२०१८

२८८५८

उपअभियंता
"फ" प्रभाग स्थापत्य व मुख्यालय
पिंपरी-चिंचवड मनपा.. पिंपरी-१८

---

जिल्हाधिकारी कार्यालय पुणे
महसूल शाखा
क्र.पमह/सीआर/११/२०१९
पुणे -१ दिनांक१९/०९/२०१९

जिल्हाधिकारी पुणे

विषय :- जमीन-पुणे
मौजे चिखली, ता. हवेली येथील ग नं. १६५३ पै. मधील जागा पिंपरी चिंचवड महानगरपालीकेस **मनपा उपयोग (हॉस्पिटल, अग्निशमन केंद्र, प्राथमिक शाळा)** रस्ता या प्रयोजनार्थ आगाऊ ताबा देणेबाबत..

## आदेश

ज्याअर्थी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी दिनांक ०९/०९/२०१५ रोजीच्या पत्रान्वये मौजे चिखली, ता. हवेली येथील ग नं. १६५३ पै. मधील खालील नमुद परिशिष्ठामध्ये नमुद केलेली जागेचा विकास आराखडयातील आरक्षणाच्या अनुषंगाने सार्वजनिक प्रयोजनार्थ आगाऊ ताबा देणेबाबत विनंती केलेली आहे.

### परिशिष्ठ

| अ.क्र. | गावाचे नाव | ग.नं. | ७/१२ नुसार क्षेत्र | क्षेत्र | आरक्षण क्रमांक | प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | चिखली | १६५३ | २० हे २२ आर | २ हे ० आर | १/८८अ | मनपा उपयोग (हॉस्पिटल) |
| २ | | | | १ हे ० आर | १/८८अ | मनपा उपयोग (अग्निशमन केंद्र) |
| ३ | | | | १ हे ६२ आर | १/८८ब | मनपा उपयोग (प्राथमिक शाळा) |
| ४ | | | | १ हे ५५ आर | -- | १२ मी. व १८ मी. रस्ता |

शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र. जमीन १०९१/७१३/प्र.क्र.५९/ज-१ दिनांक १४/१२/१९९८ मधील २(ब) नुसार "सर्व प्रकारच्या नगरपालिका (अ,ब,क संवर्गातील), महानगरपालिका क्षेत्रातील तसेच ज्या क्षेत्रासाठी

प्रादेशिक विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे अशा सर्व क्षेत्रातील गायरान / गुरेचरण जमिनी ज्या प्रयोजनासाठी आरक्षित केल्या आहेत त्या प्रयोजनासाठी सदर जमिनीचा वापर करण्यास हरकत नाही. तथापि, असे करण्यापुर्वी सदर जमिनीच्या अधिकार अभिलेखातील गायरान / गुरचरण अशी नोंद योग्य ती कार्यपध्दती अवलंबून कमी करण्यात यावी व त्यानुसारच अशा जमिनी शासकीय जमिनी म्हणून दाखविण्यात याव्यात असे नमूद आहे.

महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र. जमीन-२०१७/प्र.क्र.२३४/ज-१ दि.२२ आक्टोंबर २०१८ अन्वये राज्यात राबविण्यात येणाऱ्या जनहिताच्या शासन मान्य प्रकल्प (महानगरपालिका, शासकीय प्राधिकरण) किंवा शासकीय प्रकल्प यासाठी शासकीय जमीनीचा आगाऊ ताबा देताना भोगवटा मुल्य आकारण्याच्या बाबतीत क्षेत्रीय महसुल प्राधिकारी यांना खालीलप्रमाणे सुधारीत दिशानिर्देश देणेत आलेले आहेत.

महानगरपालिका किंवा शासकीय प्राधिकरण यांना राज्य शासनाने प्रशासकीय मान्यता दिलेल्या जनहिताच्या प्रकल्पासाठी किंवा शासकीय प्रकल्पासाठी शासकीय जमीन आवश्यक असल्यास अशा शासकीय जमीनीचा भोगवटा मुल्यरहित आगाऊ ताबा संबंधित महानगरपालिका अथवा शासकीय प्राधिकरण यांना जिल्हाधिकारी यांचेकडुन देणेत येईल. आगाऊ ताबा दिल्यानंतर संबंधित प्राधिकरणास अशा जमीनीवर मंजुर प्रकल्पाचे काम करण्यास मुभा असेल. दरम्यान जिल्हाधिकारी यांनी शासनाच्या प्रचलित धोरणानुसार अशा आगाऊ ताबा दिलेल्या शासकीय जमीनीचे भोगवटा मुल्य निश्चीत करुन ते शासनास अदा करण्याबाबत संबंधित महानगरपालिका किंवा शासकीय प्राधिकरण यांना कळवावे त्यानुसार जिल्हाधिकारी यांनी निश्चीत केलेले भोगवटा मुल्य शासनास अदा करणे संबंधित महानगरपालिकेवर किंवा शासकीय प्राधिकरणावर बंधनकारक असेल असे नमुद आहे.

सदयस्थितीत सदरची जमीन ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हददीत समाविष्ट झालेने तेथील गुरचरण हा उददेश संपुष्टात आलेला आहे. व या जमीनी सार्वजनिक प्रयोजनाकरीता आरक्षण निहाय विकासकामाकरीता हस्तांतरीत करणे आवश्यक असलेचे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी, मी, **नवल किशोर राम**, जिल्हाधिकारी पुणे मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार ७/१२ पत्रकी कब्जेदार सदरी दाखल असलेले **गायरान** ही नोंद कमी करुन **"शासकीय जमीन"** म्हणून नोंद करणेस मंजूरी देत आहे. तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ व शासन निर्णय दि.२२/१०/२०१८ अन्वये मला प्राप्त अधिकारान्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी आरक्षणाबाबत दिलेल्या माहीतीनुसार **मौजे चिखली ता. हवेली येथील ग नं. १६५३ पै.** मधील जागा पिंपरी चिंचवड महानगरपालीकेस **मनपा उपयोग (हॉस्पिटल, अग्निशमन केंद्र, प्राथमिक शाळा)** व रस्त्याचे प्रयोजनार्थ परिशिष्टांत नमुद केल्याप्रमाणे **आगाऊ ताबा** महानगरपालिकेस राज्य शासनाद्वारा अंतिम मंजूरीच्या वेळी विहीत केल्या जाणाऱ्या अटी व शर्तीस अधिन राहुन खालील नमुद अटी व शर्तीवर देणेचा आदेश पारित करीत आहे.

## <u>अटी व शर्ती</u>

१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्रस्तुत जमीन **भोगवटादार वर्ग -२** म्हणून धारण करील व शासनाच्या (महसूल विभागाचे) पूर्वपरवानगी शिवाय हस्तांतरीत / गहाण / तारण ठेवणार नाही.

२) प्रतिग्रहिता यांना सदर जमिनीचा वापर परिशिष्टात नमुद केलेल्या प्रयोजनार्थ करणे बंधनकारक राहील. अन्य प्रयोजनासाठी शासनाच्या (महसूल विभाग) पूर्वमान्यतेशिवाय वापर करता येणार नाही.

३) मंजूर करण्यात आलेल्या जमिनीवर बांधकाम करताना स्थानिक विकास नियमावलीनूसार बांधकाम करण्यात यावे. <u>**तथापि विकास नियंत्रण नियमावलीत काहीही तरतूद असली तरी असे बांधकाम फक्त, ज्या प्रयोजनासाठी जमीन मंजूर करण्यात आली आहे, अशा प्रयोजनासाठीच करण्यात येईल.**</u>

४) सदरची जागा सार्वजनिक प्रयोजनासाठी प्रदान करावयाची असलेने सदर जागेवरील अनुज्ञेय बांधकाम चटई क्षेत्रामधील १०००.०० चौ.मी सर्व सोईसुविधा युक्त बांधकाम क्षेत्र तलाठी व मंडलअधिकारी कार्यालयासाठी विनामोबदला महसुल विभागाकडे हस्तांतरीत करणे आपलेवर बंधनकारक राहील.

५) पर्यावरणाच्या पुर्नस्थापनेसाठी व संतुलन कायम राखण्याच्या दृष्टीने विषयांकित जागेत आवश्यक तेथे वृक्ष लागवड करणे बंधनकारक राहील.

६) प्रतिग्रहिता यांनी सदर जमीनीचा वापर दिलेल्या प्रयोजनासाठी तीन वर्षात सुरु करणे बंधनकारक राहील.

७) जमिनीचा आगाऊ ताबा दिल्यानंतर जमिनीचे संरक्षण करणे, अतिक्रमण होऊ न देणे, देखभाल क[illegible] जबाबदारी प्रतिग्रहिता यांची राहील. तसेच अंतिम आरक्षणाच्या अनुषंगाने विसंगत माहीती सा[illegible] याबाबत भविष्यात कोणतेही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अथवा महानगरपालिकेचे कोणत[illegible]

प्रस्तुत जमिनीचा ताबा घेतलेनंतर व शासनाचे मंजूरी प्राप्ती नंतर प्रतिग्रहीता यांनी विहीत नमुन्यातील सनद प्राप्त करून घ्यावी.

९) प्रस्तुत जागा ताब्यात घेतल्यानंतर प्रतिग्राहिता यांनी उक्त जागेत दर्शनी भागात नमुना १८ प्रमाणे बोर्ड लावणे बंधनकारक राहील.

१०) शासन निर्णय दि. २२/१०/२०१८ मधील अटी व शर्ती तसेच अंतिम आदेशाच्या वेळी राज्य शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्ती व भविष्यात भोगवटा मुल्य अदा करणेबाबत राज्य शासनाने आदेशित केल्यास निश्चीत केलेले भोगवटा मुल्य शासनजमा करणे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेवर बंधनकारक राहील.

११) शासन परिपत्रक क्र संकिर्ण-०५/२००६/प्र.क्र४३/ज-१ दि. ३१ आक्टोंबर २००६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार मुंबई मुद्राक अधिनियम १९५८ नुसार शासनाकडील अंतिम मंजुरीनंतर करारनाम्याचा दस्त निष्पादित करणे प्रतिग्राहिता यांचेवर बंधनकारक राहील.

१२) शासन परिपत्रक क्र. जमीन/१०९१/७१२/प्र.क्र.५९/ज-१ दि.१४/१२/१९९८ मधील अटी व शर्ती बंधनकारक राहतील.

१३) प्रतिग्रहीत्याने उपरोक्त शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्यास जमीन विना मोबदला सरकार जमा करण्यास पात्र राहील.

१४) प्रतिग्रहीता यांनी सदर आदेशातील वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र ताबा घेण्यापुर्वी सादर करणे बंधनकारक राहील.

(नवल किशोर राम,)
जिल्हाधिकारी, पुणे

जिल्हाधिकारी
सत्यमेव जयते
पुणे

प्रति:-
आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी

सत्यप्रत

उपअभियंता
"फ" प्रभाग स्थापत्य व मुख्यालय
पिंपरी-चिंचवड मनपा., पिंपरी-१८